क्र.CIC/अ.क्र.६६४३/२०२६

श्री. रामशंकर अ. सरोज
703 ओमदत्त को. ऑ. हौ.
सोसायटी खांबदेव नगर धारावी, मुंबई-४०० ०१७.

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी
प्रमुख सामाजिक विकास कक्ष,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा (पूर्व), ४०० ०५१.

००

प्रथम अपिलीय अधिकारी
प्रमुख सामाजिक विकास कक्ष,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा (पूर्व), ४०० ०५१.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १०.०८.२०२६

अपीलकर्ता	:	अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी	:	अनुपस्थित
तत्कालिन जन माहिती अधिकारी	:	उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी	:	अनुपस्थित

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
१२.०९.२०२२	१६.०९.२०२२	१९.११.२०२२	--

अपिलार्थीनी दाखल केलेल्या दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या जोडपत्रावर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ वसाहत अधिकारी, जी/उत्तर विभाग यांनी उपरोक्त माहिती ही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथील सामाजिक विकास पक्षाशी संबंधित असल्याचे नमूद करीत **कलम ६ (३) (२)** अन्वये दिनांक १६ सप्टेंबर, २०२२ रोजीच अर्ज हस्तांतरित केला असल्याचे आढळून येते. तथापि, विहित मुदतीत माहिती मिळाली नसल्याचा आक्षेप नोंदवित अपिलार्थीनी दिनांक १९ नोव्हेंबर, २०२२ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला व त्यानंतर सुनावणी घेतली नसल्याचा आक्षेप नोंदवित दिनांक ३० जून, २०२२ रोजी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केला आहे.

आज झालेल्या सुनावणीत अपिलार्थी हजर नाहीत. तथापि, विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी या संदर्भात अपिलार्थीनी मागितलेली माहिती ही या आधीच सार्वजनिक संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा एक संच अपिलार्थीना तात्काळ विनामूल्य देण्यात येईल असे सूचित केले.

अपिलार्थीना उपरोक्त माहिती आदेश प्राप्त झाल्यानंतरच्या **पुढील सात दिवसात विनामूल्य** देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

आदेश

१. **वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

२. **अपिल क्र.६६४३/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

स्वाक्षरीत/-

मुंबई **(राहुल भा.पांडे)**

दिनांक : १०.०८.२०२६ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**